ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

Marathi Part - III / IV

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# २०. नक्षलवादाच्या वाढीची कारणे व शासनाची भुमिका

प्रा. डॉ. हट्टेकर विजय दत्तात्रय
राज्यशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू महा. भोकर जि. नांदेड.

## प्रस्तावना

भारतातील नक्षलवाद ही आपल्या देशाबरोबर जगासमोरील एक गंभार समस्या निर्माण झाली आहे. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले व ब्रिटीशांच्या दडपशाही धोरणातून मुक्तता मिळाली. स्वातंत्र्य प्राप्त झाले असा आनंद जनतेला झाला. परंतू हा आनंद फारकाळ टिकला नाही. स्वकीयांच्या हातात सत्ता आल्यानंतर काही वर्षातच भारतीयांची झोप उडविण्याचे कार्य नक्षलवादी च्या आगमनाने पार पाडले. घटना परिषदेने भारतीय जनतेला स्वातंत्र्य समता, सुख समाधान मिळावे म्हणून घटना परिषदेतील सर्व सदस्य आणि घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांतील घटनांचा अभ्यास करुन या घटनेत भारतीयांना स्वातंत्र्य,समता,न्याय, बंधुतावर आधारित लोकशाही निर्माण केली व सर्व नागरिकांना जीवन जगण्याचा, मूलभूत हक्क प्रदान केला गेला. परंतू स्वातंत्र्याच्या १ ल्या दशकानंतर शांततेचा भंग व्हावयास सुरुवात झाली आणि बेकायदेशीर कृत्य, हिंसा याचा आधार नक्षलवादी संघटनेचे घेतला व दहशत पसरवीली यातून राज्य, राष्ट्र समाजाच्या विकासात फार मोठे अडथळे निर्माण झाले. आधुनिक काळात लक्षलवाद व दहशतवाद या संज्ञा एकाच अर्थाने वापरण्यात येतात. दहशतवाद हा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर असतो आणि नक्षलवाद राज्य व सामाजिक स्तरावर जोपासला जातो.

नक्षलवाद या शब्दाला चळवळ शब्द जोडला गेला. यामूळे इतर संघटना व सार्वभौमत्वा समोर आव्हान उभ्या करणाऱ्या अतिरेकी, अविवेकी, संस्थामध्ये आपोआप अंतर पडते. विशिष्ट तत्वज्ञान घेऊन समाजरचनेतील परिवर्तनाचे ते दुस्वप्न पाडताना आढळतात. याकरीता काटेरी मार्गावर चालत जाण्याचा दृढ आत्मविश्वास बाळगतात.

## उद्दीष्टे

१. नक्षलवादाचा अर्थ काय ते समजावून घेणे.
२. नक्षलवादाच्या वाढीची कारणे स्पष्ट करणे.
३. नक्षलवादाच्या मागण्याचा अंदाज घेणे.
४. नक्षलवादाचे राज्य,समाज,राष्ट्रावर होणारे परिणाम कोणते ते स्पष्ट करणे.
५. नक्षलवादाबद्दल शासनाची भूमिका कोणती ते स्पष्ट करणे.
६. नक्षलवादावरील उपायाचा शोध घेणे.

## नक्षलवादा उदय,आरंभ,उत्पत्ती

२५ मे १९६७ मध्ये पश्चिम बंगाल मधील दर्जिलिंग नक्षलवादी या छोटया गावातून लक्षलवाद शब्दाची उत्पत्ती झाली. तेथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीयाचे उग्रवादी नेते यास मुजुमदार टी. नागरेडडी कातू सयास यांनी कम्युनिस्ट क्रांती कारकांच्या

नेतृत्वाखाली आंदोलन केले. हे आंदोलन सामाजिक विषमता जमीनीचे असमान वाटप, जमीनदाराचे शोषन जुलूम, अन्याय, अत्याचार या विरोधात होते. या आंदोलनासच नक्षलवादी असे नाव पडले. मुजूमदार हे चीनच्या माओ विचारांचे समर्थक पुरस्कर्ते होते. त्यांनी भारतातील पददलीत व शोषीत लोकांना एकत्रित करुन क्रांतीकारी आंदोलनास जन्म दिला. या आंदोलनास मुजुमदारी आठ ऐतिहासीक दस्ता ऐवजामध्ये लिपीबद्ध केले. त्याला नक्षलवाद विचारधारा मुख्य ग्रंथ समजला जातो. यातूनच सन १९६९ मध्ये औपचारिक रुपाने कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचा (मार्क्सवादी लेनिनवादी) जन्म झाले. याचे नंतर वेगवेगळया भागात विभाजन झाले. उदा. माओ ईस्ट कम्युनिस्ट सेंटर (एम.सी.सी) पिपल्स पॉर ग्रुप (पी.डब्लू.जी.) मध्ये विभाजन झाले. हे आंदोलन १९८० च्या दशकात जवळपास ३० छोटया छोटया समुहात विभाजीत झाले.

या चळवळीचा प्रभाव भारतातील जवळजवळ २० राज्यात ही चळवळ पसरली आहे. महाराष्ट्रातील जिल्हे उदा. गडचिरोली,चंद्रपूर,भंडारा,यवतमाळ ई. या चळवळीत मेडीकल, इंजिनीअरींगच्या व उच्च विद्या विभूषित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला हे विशेष. नक्षलवादी हिंसाचारात सातत्याने वाढच होताना दिसते. उदा. २००१-१२०० च्यांवर, २००२ मध्ये १४५० च्यावर आक्रमणे झाली. जमीनदार, श्रीमंत शेतकरी, व्यापारी, राजकीय व्यक्ती हेच नक्षलवादाचे टारगेट आहेत.

नक्षलवाद म्हणजे शस्त्राच्या बळावर हिंसक मार्गाचा वापर करुन आपले ध्येय साध्य करणारी संघटना होय. जॉन केटम यांच्या मते, राजकिय उद्दीष्टे प्राप्त करण्यासाठी अवैधानिक मार्ग अवलंबणारे व हिंसात्मक कार्य करणारी संघटना म्हणजे नक्षलवाद होय.

**नक्षलवाद चळवळीची झालेली वाढ**

माओवादी तत्वाज्ञानापासून प्रेरणा घेतलेल्या नक्षलवादी चळवळीला दोन वर्षाच्या काळात फार प्रसिध्दी मिळाली. १९७१ च्या जून पर्यत ही वाढ वेगाने सुरु होती. प.बंगालमध्ये सुरु झालेली चळवळ देशाच्या अनेक भागात पसरली. वर्गशत्रुचा बिमोड करणे हा या लढयाचा दृष्टीकोन होता.

नक्षलवादी गावातून हिंसात्मक चळवळीला सुरुवात झाली. म्हणून या चळवळीस नक्षलवादी चळवळ म्हणतात. १९६७ साम्यवादी विचाराने प्रभावित जमिनी बाबतच्या आंदोलनात किसानसभा चर्चेत होती. २ मार्च १९६७ स्थानिक जमीनदारांच्या गुंडांनी एका बिगुल नावाच्या शेतकऱ्यास मारले, आणि दुसऱ्याच दिवशी जमीनीच्या मोठया भागास लाल रंगाच्या झेंड्यानी घेराव घालून जमिन खणायला सुरुवात केली. पोलिसाने या आंदोलन कर्त्यावर कारवाई केली. या बदल्यात शेतकऱ्यांनी एका पोलीस इन्स्पेक्टरची हत्या केली. यानंतर नक्षलवादी चळवळीनी हिंसेचा आधार घेऊन अनेक जमीनदारांचा खुन केला.

जमीनदाराकडून अत्याचार झालेल्या भूमिहीन व जातीप्रथेच्या छळाला त्रासलेले लोक या आंदोलनात सहभागी झाले. या आंदोलनात जमीन हडपणे, पिकांची कापणी करणे, लुटमार, गोळी मारणे यातून कायदा सुव्यवस्था धोक्यात आली.

**ही चळवळ सुरु होण्याची इतर कारणे.**

१ शोषण आणि अन्यायाची प्रवृत्ती

२ शासक व शासित यांच्यातील संवादहिनता



Scanned with Oken Scanner

३. आर्थिक विकासातील असमतोल

४. राज्यकर्त्यांचा भ्रष्टाचार

५. भूमिहीन शेतकऱ्यांचे स्त्रीयांवर होणारे अत्याचार

वरील कारणामुळे भारतात नक्षलवादी चळवळीत वाढ झाली.

**नक्षलवादाचे राज्य व समाजव्यवस्थेवरील परिणाम**

आज नक्षलवादी चळवळीमुळे समाज, राज्यव्यवस्था कशी होरपळून निघाली. ते पुढील उदा. देऊन सांगता येईल. या सद्यस्थितीत या चळवळीमध्ये-जातीवाद-गटतट, समाज विरोधी कार्ये, सुरक्षा यंत्रणेवर हल्ले, हत्यारांची लूट गरीब शेतकरी वर्गास वेठीस धरणे, नरसंहार, रस्ते, पूल, सरकारी कार्यालये उध्वस्त करणे ई. कृती या आंदोलनकाळी स्वीकारल्या आहेत. झारखंड,छत्तीसगढ,बिहार, ओरिसा,प.बंगाल,महाराष्ट्रातील विदर्भ येथील त्यांची केंद्र प्रामुख्याने वरील कृत्य करताना दिसतात. राज्यसुरक्षा दलाने वेगवेगळया अभियानातून नक्षलवादी चळवळीतील प्रमुख नेत्यांना अटक केली होती.

याचा परिणाम असा झाला की, माओ वाद्यांनी देशभर हिंसाचाराचा वापर केला. उदा.झारखंड मध्ये पोलीस अधिकाऱ्याची हत्या २७ ऑक्टोबर २०००९ ला पश्चिम बंगाल मधील राजधानी एक्सप्रेसच्या प्रवाशांना बंधक बनविले. व छत्रधर महतोची सुटका व्हावी अशी मागणी केली. व हे आंदोलन थांबनार नाही असा इशारा दिला.

गृहमंत्रालयाच्या अहवालानुसार वर्तमान स्थितीत नक्षलवादी हिंसाचारात १० हजार पेक्षा अधिक शस्त्रधारी केडर, ५० हजारापेक्षा जास्त नियमीत केडर इतकी संख्या कार्यरत आहे. भारतातील २० राज्यातल २२० जिल्हात या चळवळीचा प्रभाव आहे. या नक्षलवादाचा धोका दहशवादापेक्षाही जास्त आहे. उदा. आंध्रप्रदेशचे माजी मुख्य मंत्री चंद्रबाबू नायडू व प. बंगालचे मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य हे नक्षलवाद्यांनी केलेल्या प्राणघातक हल्यातून वाचले आहेत. वरील हिंसाचारामुळे समाज व राज्यावर याचा वाईट परिणाम झाला आहे. याबद्दल पंतप्रधान मनमोहनसिंग म्हणाले की, नक्षलवाद हे भारतातील अंतर्गत सुरक्षेचे सर्वांत मोठे आव्हान आहे. यावरुन नक्षलवादाचा समाज राज्य व राष्ट्रावर किती परिणाम झाला आहे ते दिसून येते.

**नक्षलवादी चळवळीस संपुष्टात आणण्यासाठी शासनाची भूमिका**

नक्षलवादामुळे समाज जीवनावर आणि विकासावर फार मोठ्या परिणाम झाला आहे, देशाच्या अंतरिक सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. म्हणून ही चळवळ संपुष्टात आणण्यासाठी सरकारने नवीन रणनिती आखली आहे. ती म्हणजेच माओवाद्यांच्या विरोधात राज्य पोलीस यंत्रणा धुरा सांभाळेल. आणि त्यांना केंद्रीय पोलीस यंत्रणा सहकार्य करेल.

तसेच नक्षलवादाला आळा घालण्यासाठी १९७० मध्ये बहुतांश राज्यांनी कमाल जमीन धारणा कायदा पास केला होता. कारण क्रांतीकारी चळवळ अयशस्वी होईल हा त्या मागचा उद्देश होता. यानुसार सरकारणे अतिरीक्त जमीनी ताब्यात घ्याव्यात स्थानिक भूमिहिनांना वाटप करणे अशी तरतूद होती. पण या कायदयांची अंमलबजावणी झाली नाही. म्हणून हिंसाचारात वाढ झाली. नंतर सरकारने नक्षलवादी विरोधी अभियाना अंतर्गत विशेष कमांडो दल स्थापन करुन सत्तर हजार सैनिक तैनात केले जातील.

सामाजिक व्यवस्थेच्या सुरक्षीततेसाठी व नक्षलवादविरोधी अभियानासाठी ७३ हजार कोटी रु ची तरतूद केली आहे की ज्यामुळे नक्षलवादाला आळा बसू शकेल.

हे आंदोलन झारखंड, बिहार, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, ओरिसा, महाराष्ट्रतील विदर्भ अशा भागात ५० हजार वर्ग कि.मी मध्ये चालविले जाईल.

तेसच सरकारने नक्षलवाद संपूष्टात आणण्यासाठी एक उपाय योजना आखली की, नक्षलवादयांनी हिंसाचार सोडून सामान्य प्रवाहात सामील झाले तर त्यांना दरमहा २५ हजार रु. आर्थिक मदत दिली जाईल.

भारताच्या पंतप्रधानाने एक वंक्तव्य केले ते म्हणजे माओवादी, नक्षलवादी यांना दहशतवादी शब्द वापरु नये आणि त्यांच्या हिंसाचारी वृत्तीच्या मुळ कारणापर्यंत जाऊन शोध घ्यावा.

तसेच नक्षलवादा विरोधी मोहिमेत ऑरेशन क्रोब्रा हे विशेष सूरक्षार कमांडो पथक महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्हात दाखल होत आहे. परंतू सरकारच्या आक्रमक मोहिमेमुळे नक्षलवादी आपली धोरणे बदलत आहेत. यातच स्थानिक जनतेचा पाठिंबा नक्षलवादयांना मिळत असल्यामूळे नक्षलवादयांचा । विमोड करणे शक्य होणर नाही.

**नक्षलवादावरील उपाययोजना**

१. शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे व त्याचे नक्षल प्रभावीत लोकांना शेती वाटून दयावी.

२. नक्षलवादी होण्यापाठी मागची कारणे शोधावीत.

३. शासनांच्या योजनांनी नक्षलप्रभावीत क्षेत्रामध्ये योग्य ती अंमलबजावणी करावी.

४. भ्रष्टाचारावर आळा घालावा.

५. नक्षलप्रभावीत क्षेत्रामध्ये तरुणांना स्थानिक पातळीवर प्रशासकीय नौकऱ्यात राखीव जागा दयाव्यात.

६. नक्षलवादयांविषयी बोलणी करुन प्रश्न शांतपणे व वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावीत.

७. जमीनदार श्रीमंत व्यापारी राजकीय, प्रशासकीय अधिकारी ई. नी सर्वसामान्यांना न्याय वागणूक दयावी.

८. अल्प भूधारक किंवा गरिबांच्या स्त्रियांवर व मुलींवर अत्याचार होणर नाहीत याची काळजी घ्यावी.

९. नक्षलवादयांचा सामना करण्यासाठी पोलिंसाना आधूनिक शस्त्रास्त्र देणे तसेच पोलिसांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

नक्षलवादाच्या वाढीची कारणे व शासनाची भूमिका या शिक्षकांतर्गत नक्षलवादी चळवळीचा अभ्यास करुन हा शोध निबंध लिहीला आणि वरील प्रमाणे नक्षलवादाच्या उदयाची कारणे या गरीबी अल्पभूधारक व आदिवासीवर होणारे अन्याय व अत्याचार यामुळे नक्षलवादी चळवळ खऱ्या अर्थाने प.बंगालमध्ये मुजुमदाराच्या नेतृत्वाखली सुरु झाली आणि वर्षानुवर्षे यात वाढच होताना दिसते. या चळवळीचे पाळेमुळे पूर्ण देशभर विखूरले आहेत. आणि हया नक्षलवादाने समाज, राज्य आणि राष्ट्रासमोर सुरक्षेची एक गंभीर समस्या निर्माण केली हे दिसून आले.

तसेच नक्षलवादी चळवळीत वाढ होताना दिसून आली. याची कारणे ही वेगवेगळी आहेत. उदा. शोषण, बेकारी, आणि स्त्रियांवर होणारे अत्याचार या कारणामुळे नक्षलवादी चळवळ वाढतच गेली व याचे परिणाम वेगवेगळया स्वरुपात पहावयास मिळाले ते म्हणजेच लुटमार, हिंसा, अपहरण, हत्या घडवून आणणे ई. नक्षलवादी चळवळीने सुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण केला व शासनाने वेगवेगळया माध्यमातून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. उदा. विशेष कमांडो दल स्थापन करुन वेगवेगळया

पैशाची तरतूद करुन, हिंसेचा मार्ग सोडून सामाजिक जीवनात सहभागी होणाऱ्यास २५ हजार रु. दरमहा देणे इ. मार्गाचा अवलंब केला. असे असले तरीही ही चळवळ सोडविण्यासाठी सर्वच स्तरावरील लोकांनी शासनाला मदत केली पाहीजे. तसेच नक्षलवादी चळवळ संपुष्टात आणण्यासाठी या भागातील लोकांच्या खऱ्या समस्या काय आहेत, त्यांचे प्रश्न कोणते आहेत ते समजावून घेऊन ते प्रश्न किंवा समस्या सोडविण्याचा शासनाने प्रयत्न करावा, नक्षलवादयांना विश्वासात घेऊन त्यांचे समाधान होईल असे भरीव कार्य करण्याचा प्रयत्न केल्यास नक्षलवादाचा प्रश्न सोडविणे अवघड नाही.

**संदर्भ**

१. दैनीक लोकमत
२. राज्यशात्र लेखक - शेक्ष हाशम आणि गवई
३. दै. वृतरत्नसम्राट
४. रामकृष्णन, व्यंकटेश (२००९) टेकिंग ऑन माओ अिस्टस फ्रंटलाईन, नोव्हें.२००६
५. रॉय, अरुणधती (२००९) : मिस्टर चिदंबरमस, वॉर, आऊटलूक, ०९ नोव्हे
६. साक्रीकर, दिनकर (१९७१) : नक्षलवादी मराठी विश्वकोश, क्षंड ८
७. Mainstream June २००६
८. PUCL. Bulletin - Nov.२००२
९. Mahatma Gandhiche Tatvdyan v Bhartiy Lokshahichi Sadheshtiti **Dr.Vijay Hattekar,** SCHOLARS IMPACT, Volume6, Issue SP 1 Pages68-71
१०. Mahatama Gandhi che swatrntry che vichar Authors Dr. Vijay Hattekar Publication 2019 Journal CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES Pages 42-46 Volume 5
११. Bhartamadhil rajkiya Brastachar Authors Dr. Vijay Hattekar Publication date2012 Journal Vision Research Journal For Political Science & Public Administration, Volume1 Issue2 Pages78-85 Publisher Jotichandra Publication PVT LTD



Scanned with Oken Scanner